| MHAH070000142026 | <u>फौजदारी संकिर्ण अर्ज क्र.०२/२०२६ आदेश नि.१</u><br>संतोष बाबासाहेब शेलार<br>वि.<br>महाराष्ट्र शासन |
|---|---|

संगमनेर शहर पोलीस ठाण्याचा गुन्हा रजि. क्र.६२७/२०२५ मधील जप्त मुद्देमाल वीवो कंपनीचा, मॉडेल क्र.Y 29 काळया रंगाचा IMEI क्र.८६६४२३०७३१९६६७४ मोबाईल फोनचा ताबा मिळण्याकरीता संतोष बाबासाहेब शेलार यांनी दिलेला अर्ज वाचला.

२. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. वाकचौरे यांनी दिलेले नि.०७ चे लेखी उत्तर वाचले.

३. उभय पक्षकारांचे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. नि.०९ चे यादीसोबतचे मुळ पावती (Tax invoice) वाचली असता असे निदर्शनास येते की, अर्जदार संतोष बाबासाहेब शेलार हे जप्त मुद्देमाल वीवो या मोबाईल फोनचा, मॉडेल क्र.Y २९ काळया रंगाचा IMEI क्र.८६६४२३०७३१९६६७४ चे मालक आहेत. सदर मोबाईल त्यांनी दि.२९.०५.२०२५ रोजी खरेदी केलेला आहे.

५. नि.०५ चे अर्जदराचे प्रतिज्ञालेखात असे नमूद आहे की, उपरोक्त नमूद वर्णनाचा मोबाईल अर्जदाराने दि.२९.०५.२०२५ रोजी पुजारा टेलीकॉम प्रा. लि. शॉपी, संगमनेर येथून खरेदी केला होता. तेंव्हापासून सदर मोबाईल अर्जदार स्वतः वापरत होता. सदर मोबाईल संगमनेर शहर पोलीस यांनी गु.र.क्र.६२७/२०२५ मध्ये अर्जदार संतोष शेलार कडून जप्त केला आहे.

६. गुन्हा रजि. क्र.६२७/२०२५ चा तपास पुर्ण होवून दोषारोपपत्र दाखल होवून त्या खटल्याचा न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागेल. सदर मोबाईल हा संगमनेर शहर पोलीसांनी जप्त केला आहे. तो वापराअभावी खराब होण्याची शक्यता आहे. मोबाईल फोन पोलीस ठाण्यामध्ये पडून राहिल्यास तो निकामी होण्याची शक्यता

आहे. तसेच खटल्याचा न्यायनिर्णय होईपावेतो मोबाईल सांभाळण्याची अनावश्यक जबाबदारी संगमनेर शहर पोलीसांना घ्यावी लागेल. त्यामुळे अटी व शर्तींना अधीन सदर मोबाईलचा ताबा अर्जदार संतोष बाबासाहेब शेलार यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९७ व ५०३ च्या तरतुदीनुसार देण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल. सबब आदेश.

## आदेश

अ. अर्ज (निशाणी क्र.०१) मान्य केला आहे.

ब. रक्कम रुपये १५,०००/- चे क्षतीपूर्ती बंधपत्र (indemnity bond) अर्जदार संतोष बाबासाहेब शेलार यांचेकडून स्वीकारुन सदर वीवो कंपनीचा, मॉडेल क्र.Y २९ काळया रंगाचा IMEI क्र.८६६४२३०७३१९६६७४ मोबाईल फोनचा ताबा खालील नमूद अटी व शर्तींना अधीन अर्जदार संतोष बाबासाहेब शेलार यांना देण्यात यावा.

**अटीः-**

i. गुन्हा रजि.क्र.६२७/२०२५ चे संबंधीत खटल्याचा न्यायनिर्णय होईपावेतो अर्जदार संतोष बाबासाहेब शेलार यांनी उपरोक्त नमूद मोबाईलमध्ये कोणत्याही स्वरुपाचा फेरबदल करु नये, त्याची विक्री अथवा कसल्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये.

ii. न्यायालय आदेश करेल तेंव्हा अर्जदाराने सदर मोबाईल न्यायालय अथवा पोलीसांसमोर सादर करावे.

iii. सदर मोबाईलचा कोणत्याही गुन्हयासाठी वापर होणार नाही याची हमी दयावी.

क. गुन्हा रजि.क्र.६२७/२०२५ चे तपासी अधिकारी अथवा संगमनेर शहर पोलीस निरीक्षक यांनी सदर मोबाईलमधील डाटा जो सदर गुन्हयासाठी ग्राहय धरला जाईल तो काढून घ्यावा, तसेच सदर मोबाईल फोनची रंगीत छायाचित्रे

अर्जदाराच्या खर्चाने काढून घ्यावीत व ती गुन्हा रजि.क्र.६२७/२०२५ चे दोषारोपपत्रासोबत दाखल करावीत.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2026.03.12 17:10:50 +0530

संगमनेर

दिनांक –१२/०३/२०२६

( मंदार नेरलेकर )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
संगमनेर.